REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

*" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख ३० आगस्ट, १९५० अंक ३५

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. श्री छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे
सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा
पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची
जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

**स्थापना: १९१६.**

मुख्य कचेरी :
**सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : **BANKOP** फोन : २८९

| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

**शाखा :**

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर
(४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी
(७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–
फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

**—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—**
**मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची
उत्तम व्यवस्था.**

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

फोन: ३४५१९ तार: SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

**९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.**


**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:—**

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

**खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—**

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें
सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती
आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व
कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि
कोळसा वगैरे.




## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत ( लाकडें कापण्याकरितां ) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

**जी. जी. दांडेकर मशिन
वर्क्स लिमिटेड**

भिवंडी जि. ठाणें
व्हाया–कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



दळणाच्या चक्क्या-टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**जागतिक बँकेचें ऑस्ट्रेलिआला कर्ज**—जागतिक बँकेनें ऑस्ट्रेलिआला ५,००,००,००० डॉलर्स कर्ज देण्यास मंजुरी दिली आहे असें समजतें. दर वर्षी वरील इतकीच रक्कम पांच वर्षेपर्यंत कर्जाऊ देण्यांत येणार आहे. शेतकीचीं व वहातुकीचीं यंत्रें करण्यासाठी आणि ऑस्ट्रेलिआंत येणाऱ्या हजारो आश्रयार्थींना तयार घरें पुरविण्यासाठी ह्या कर्जाचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**बडोदा लँड मॉर्टगेज बँक**—बडोदा लँड मॉर्टगेज बँक ही डिस्ट्रिक्ट लँड मार्टगेज बँक म्हणून या पुढेंही काम करणार आहे; परंतु ती कर्जरोखे मात्र काढणार नाहीं असें समजतें. ह्यापूर्वी बडोदा सरकारची मंजुरी असलेलीं दोन कर्जे बँकेनें काढलेलीं होतीं. त्यांची दर्शनी किंमत ८ लाख रु. ची आहे. ह्या कर्जांचें मुद्दल आणि व्याज ह्यांची हमी मुंबई सरकारनें आतां घेतली आहे. डिबेंचर ट्रस्टी म्हणून मुंबई सरकारनें रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव्ह सोसायटीज ह्यांची नेमणूक केली आहे.

**सोडिअम सल्फेटचा कारखाना**—जोधपूर येथें सोडिअम सल्फेट तयार करणारा एक कारखाना आहे. कारखान्याला लागणारा कच्चा माल भरपूर असल्यामुळें ह्या कारखान्याचें उत्पादन वाढविण्यासंबंधीं विचार चालू आहे. कागदाच्या व कातड्याच्या कारखान्यांना लागणारा सोडिअम सल्फेट ह्या कारखान्यांतून मोठ्या प्रमाणावर तयार होण्यासारखा आहे. उत्पादन वाढविल्यास भारताची ६० टक्के गरज हा कारखाना भागवूं शकेल.

**नागपूरला विजेच्या बल्बचा कारखाना**—नागपूरला विजेच्या दिव्यांचे बल्बस तयार करण्याचा एक कारखाना निघणार आहे असें समजतें. कारखाना नागपूर इलेक्ट्रिक कंपनीतर्फे चालविण्यांत येणार आहे. भारतांत अशा प्रकारचा हा दुसरा कारखाना आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ५०,००० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

**बॅटरीज तयार करण्याचा कारखाना**—मद्रास शहरांतील सैदापेठ ह्या उपनगरांत बॅटरीज तयार करण्याचा एक कारखाना निघणार आहे. एका सुप्रसिद्ध ब्रिटिश कंपनीच्या साह्यानें कांहीं हिंदी भांडवलदार तो काढणार आहेत. प्रत्यक्ष उत्पादनाला सुरवात या वर्षाअखेर होईल असा अंदाज आहे. पहिल्या वर्षी मोटारींना लागणाऱ्या २०,००० बॅटरीज तयार करण्याच ठरलें आहे. कंपनींत १२० कामगारांना शिक्षणही देण्यांत येणार आहे.

**कोरियन लढाईचा परिणाम**—जपानला सयामकडून, व ब्रह्मदेशाकडून २,५०,००० टन तांदूळ आयात करावा लागणार आहे. द. कोरियांत युद्ध सुरू झाल्यामुळें जपानला तिकडून पुरवठा बंद झाला आहे. परंतु सयामकडे आणि ब्रह्मदेशाकडे सीलोन, भारत, मलाया, इत्यादि देशांचीही मागणी असल्याकारणानें जपानला तांदूळ मिळणें कठीण जाईल. तांदूळ मिळाला नाहीं तर जपान ऑस्ट्रेलियाकडून गहूं आयात करण्याच्या विचार करीत आहे.

**कॉंग्रेस अधिवेशनासाठी वीज**—सप्टेंबर महिन्यांत नाशिकास कॉंग्रेसचें ५६ वें अधिवेशन भरणार आहे. अधिवेशनासाठी उभारण्यांत आलेल्या गांधीनगरला विजेचा पुरवठा करण्यांत येणार आहे. नाशिक-देवळाली इलेक्ट्रिक कंपनी ह्या कामासाठी एक खास केंद्र गांधीनगरला उघडणार आहे. केंद्रामार्फत १५० किलोवॅट वीज पुरविण्याची सोय करण्यांत येणार आहे.

**भारताचें उत्पादन वाढलें**—१९५० च्या पहिल्या सहा महिन्यांत भारताचें औद्योगिक उत्पादन वाढलें असल्याचें दिसून येतें. कोळसा, पोलाद, मीठ, सिमेंट, कागद, डिझल इंजिन्स, सायकली; इत्यादि बहुतेक धंद्यांचें उत्पादन वाढलें आहे. कापडाचें उत्पादन मात्र १९४९ च्या दुसऱ्या सहामाहीपासून कमी होत होतें. परंतु कापडाच्या उत्पादनांतही सुधारणा होत असल्याचें समजतें.

**ब्रिटनची शस्त्रास्त्रनिर्मिति**—ब्रिटननें येत्या तीन वर्षांत ९,५२,००,००,००० डॉलर्स किंमतीचीं नवीं शस्त्रास्त्रें तयार करण्याचें ठरविलें आहे. ब्रिटनमध्यें सध्या २,८२,००० बेकार असून ते ज्या भागांत रहातात त्या भागांतील कारखान्यांकडे शस्त्रास्त्रनिर्मितीच्या मागण्या प्रथम नोंदविण्यांत आल्या आहेत. ह्या भागांतील कारखान्यांना काम पुरविल्यावर उरलेल्या मागण्या दुसऱ्या कारखान्यांकडे नोंदविण्यांत येणार आहेत.

**सक्तीच्या बचतीची योजना**—राजस्तान सरकारनें आपल्या नौकरवर्गासाठी एक सक्तीची बचत योजना अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. २५१ ते ५०० रुपये मासिक वेतन असणाऱ्या नोकरांच्या पगारांतून रुपयामागे १॥ आणा ह्याप्रमाणें प्रॉव्हिडंट फंड कापण्यांत येणार आहे. २००१ ते ३००० रु. पगार असणाऱ्यांच्या पगारांतून रुपयामागे ३ आणे प्रॉव्हिडंट फंडासाठी कापून घेण्यांत येणार आहेत.

**ऑस्ट्रेलिआंतून गहूं आला**—ऑस्ट्रेलियाहून कलकत्ता बंदरांत ८०,००० टन गहूं घेऊन एक बोट नुकतीच आली. हा गहूं प. बंगालसाठी मागविण्यांत आला होता. ह्यापूर्वी आणखी दोन बोटींतून ११,००० टन आणि पंजाबकडून ९६० टन गहूं कलकत्त्याला आला होता. प. बंगालची अन्नधान्याची अडचण लक्षांत घेऊन भारत सरकारनें ५०,१०० टन अन्नधान्य बंगालला पुरविण्याचें कबूल केलें आहे.

**अमेरिकेंत महात्माजींचें चिताभस्म**—अमेरिकेंतील इंटरनॅशनल चर्च ह्या धार्मिक संस्थेनें महात्माजींच्या चिताभस्माचें सन्मानपूर्वक स्मारक उभारलें आहे. चिताभस्माचा कांहीं भाग एका दगडी शवपेटिकेंत घालून ती पुरण्यांत आली. ही शवपेटिका १,००० वर्षांची जुनी आहे. समारंभाच्या वेळीं, १,००० लोक उपस्थित होते. जागतिक शांतता आणि बंधुभाव ह्यांचें प्रतीक म्हणून महात्माजींचा हा सन्मान करण्यांत आला.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ३० आगस्ट, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ट्रायब्यूनलच्या निवाड्याचा लहान बँकांवर परिणाम

बँकिंग ट्रायब्यूनलनें नोकरवर्गास वाढवून दिलेल्या पगाराच्या व भत्त्याच्या श्रेणी लहान बँकांना जाचक होतील, अशी त्यांच्या चालकांची तक्रार आहे. परंतु ट्रायब्यूनलनें ह्या बाबतींत आपलें मत स्पष्ट दिलें आहे लहान बँकांना हे पगार व भत्ते परवडले नाहींत, तर त्याचा अर्थ त्या बँकांचा कारभार किफायतशीर चाललेला नाहीं, त्यांचेमध्यें कार्यक्षमतेचा अभाव आहे, त्यांनीं आपली व्यवस्था सुधारावी नाहीं तर दरवाजे बंद करावे, शक्य तर इतर बँकांत विलीन व्हावें; परंतु नोकरांच्या किमान गरजा भागवूं शकत नाहीं इतक्या अल्प वेतनावर त्यांचेकडून काम करून घेण्याची कोणत्याहि धंद्यास परवानगी असतां कामा नये, असा ट्रायब्यूनलचा दृष्टिकोन आहे. कांहीं वर्षांपूर्वी कित्येक बँकांनीं भरमसाट शाखा वाढविल्या, त्या सर्व फायदेशीर चालणें शक्य नाहीं. अशा परिस्थितींत कांहीं शाखा व कांहीं बँका बंद पडणें अटळ आहे; बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या कांहीं कडक अटी बँकांना जाचक होत आहेत; त्यांत निवाड्यामुळें भर पडत आहे, एवढेंच; असें ट्रायब्यूनलचें म्हणणें आहे. लहान बँका भरमसाट दरानें ठेवी गोळा करतात, व्यवस्थापकांना नोकरवर्गाच्या मानानें फाजील वेतन देतात, त्यांत काटकसरीस जागा आहे असें ट्रायब्यूनलनें सुचविलें आहे. परंतु ह्या सूचनेच्या अंमलबजावणीपासून फारशी निष्पत्ति होणार नाहीं ह्याची ट्रायब्यूनलला जाणीव आहे असें दिसतें. कांहीं बँका किंवा शाखा बंद झाल्यामुळें कित्येक नोकरांवर बेकारीची आपत्ति ओढवणार, परंतु त्या आपत्तीस त्यांनीं तोंड दिलें पाहिजे हें त्या बँकांतील नोकरवर्गास पटेल काय ? बहुसंख्य नोकरांना फायदा होईल त्याची झळ कांहीं बँकांतील नोकरांना लागणें अपरिहार्य आहे असें म्हणून कसें भागेल ? जेथें कमी खर्चाच्या शाखा व बँका टिकूं शकणार नाहींत, तेथें त्यांची जागा मोठ्या व जुन्या बँका घेतील व बेकार नोकरांची त्यांत सोय होऊं शकेल, हा युक्तिवाद बँकिंगच्या धंद्याच्या सध्याच्या परिस्थितींत सयुक्तिक नाहीं. रूरल बँकिंग चौकशी कमिटीच्या सूचना अंमलांत आल्या म्हणजेहि ह्या बेकारीस आळा बसूं शकेल अशीहि ट्रायब्यूनलनें थाप ठोकून दिली आहे. बँकांतील नोकरांना वाजवी पगार व भत्ता देण्याचें महत्त्व पूर्णपणें मान्य करूनहि, लहान बँकांच्या बाबतींत ट्रायब्यूनलनें जो निर्विकारपणा दाखविला आहे, तो अपूर्व आहे.

लहान बँकांनीं आपली परिस्थिति ट्रायब्यूनलपुढें मांडली होती ती अशी:—(१) एकूण उत्पन्नाशीं पडणारें खर्चाचें प्रमाण मोठ्या बँकांचे मानानें जास्त पडतें आणि निव्वळ नफा फार कमी उरतो. १९४६ पासून हें प्रमाण आणखीच वाढत आहे. (२) बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या १७ व्या कलमाखालीं जो रिझर्व्ह फंड काढावा लागतो, त्यामुळें निव्वळ नफा आणखी उतरणार आहे. (३) मोठ्या बँकांच्या मानानें लहान बँकांकडील ठेवींत मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. (४) व्यवस्था खर्चांत फारशी काटकसर करण्यास वावच उरलेला नाहीं. (५) ज्या ठिकाणीं मोठ्या बँकांचे व्यवहार नाहींत अशाच ठिकाणीं लहान बँका मुख्यतः आहेत आणि त्यामुळें त्यांचें स्थान वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांची उपयुक्तता नष्ट करणें योग्य होणार नाहीं. (६) पगार, भत्ता, वगैरे आणखी देणें त्यांस अशक्य होईल.

(१) ५० हजारांखालील वस्तीच्या ठिकाणच्या बँका व शाखा ह्यांस निवाडा लागू होऊं नये, (२) दहापेक्षा कमी नोकर असलेल्या शाखांसहि निवाडा लागू करूं नये, (३) वैद्यकीय मदत, इत्यादि गोष्टी करण्याची लहान बँकांवर सक्ति असूं नये, (४) बँकांच्या आर्थिक पात्रतेस अनुसरून पगार, भत्ता इत्यादि निश्चित करण्यांत यावा, अशी लहान बँकांची मागणी होती. तथापि, नोकरवर्गाची उपजीविका व्हावी, इतपत तरी त्यांस वेतन मिळालेंच पाहिजे, बँकेस तें परवडो वा न परवडो, ह्या तत्त्वावरच ट्रायब्यूनलनें पगार व भत्ते ठरविले असल्यामुळें त्यांचे खाली जाणें अशक्य आहे. तथापि कांहीं किरकोळ सवलती त्यांना देण्यांत आल्या आहेत. ज्या शाखेंत ८ पेक्षा ज्यास्त नोकर नाहींत अशा २५ हजारांपेक्षा कमी वस्तीच्या ठिकाणच्या शाखांतील जे नोकर स्थानिक रहिवासी असून ज्यांचीं स्वतःचीं घरें असतील, अशांना क दर्जाच्या बँकांनीं ८१/२% कमी पगार देण्यास हरकत नाहीं. मोठ्या बँकांच्या मानानें क दर्जाच्या बँकांनीं नोकरवर्गासाठीं वैद्यकीय खर्च करावयाचा तो जरा कमी प्रमाणावर आहे. अशा बँकांतील नोकरांना पृ. २८१ वर सांगितलेले स्पेशल भत्ते मिळावयाचे नाहींत. क वर्गाच्या बँकांना निवाड्याच्या अंमलबजावणीसाठीं सहा महिन्यांची मुदत देण्यांत आली आहे.

लहान बँकांच्या मागण्यांचे मानानें त्यांना फारच कमी सवलती मिळालेल्या आहेत हें वरील माहितीवरून स्पष्ट होईल. नोकरवर्गास द्यावयाचा किमान पगार आणि बँकांच्या उत्पन्नखर्चाची तोंडमिळवणी ह्यांचा मेळ कसा घालावयाचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. खर्च वाढेल त्याप्रमाणें उत्पन्नहि वाढण्याची मुळीच शक्यता नाहीं. बँका अडचणींत आल्या तर त्याचे दुष्परिणाम पैसे गुंतविणारांवर व उद्योगधंद्यांवर फारच घातुक होतात, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. एकादी कापड गिरणी बंद पडणें व एकादी बँक बंद पडणें ह्यांत फार अंतर आहे. लहान बँकांना अद्याप स्वतःचें शेअर भांडवल वाढवावयाचें असतें. निवाड्याचा डिव्हिडंडवर प्रतिकूल परिणाम झाल्यावर नवी शेअर विक्री कशी होऊं शकणार आणि बँकांना आपली परिस्थिति भक्कम करण्यास सवड कशी मिळणार ? लहान बँकांतील नोकरवर्ग पुनः असंतुष्टच रहाणार. कारण, एकाच पेठेंतील दोन बँकांमधील दोन नोकरांना वेगवेगळा पगार मिळणार. व्यवस्थापक व नोकर वर्ग ह्यांचेमधील संबंध ट्रायब्यूनलच्या निवाड्यामुळें अधिक बिघडण्यासच मदत होणार कीं काय, अशी भीति वाटते.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचें दुसरें वर्ष

३० जून, १९५० अखेर संपलेल्या वर्षी इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें एकूण ३ कोटी, ७७ लक्ष रुपयांचीं कर्जे मंजूर केलीं. त्यापूर्वीच्या वर्षी कॉर्पोरेशननें ३ कोटी, ४२ लक्ष रुपयांचीं कर्जे मंजूर केलीं होतीं. म्हणजे, कॉर्पोरेशननें तिच्या स्थापनेपासून ३० जून, १९५० अखेरपर्यंत ७ कोटी, १९ लक्ष रुपयांचीं कर्जे मंजूर केलीं आहेत. ह्या मंजूर कर्जांपैकी ३,४१,७४,३०० रुपयांचीं कर्जे प्रत्यक्ष घेतलीं गेलीं आहेत. कॉर्पोरेशननें आपली कर्जे देण्याची शक्ति वाढविण्यासाठी ५ कोटी १० लक्ष रुपयांचे ३½ % व्याजाचे व १९६४ मध्यें परतफेडीचे बाँड विक्रीस काढले. त्यामुळें, आणखी सहा ते बारा महिनेपर्यंत कर्जे मंजूर करण्यापुरता पैसा कॉर्पोरेशनजवळ असेल. कॉर्पोरेशन आपल्या कर्जांवर सामान्यत: ५ % व्याज आकारतें. अहवालाचे वर्षी कॉर्पोरेशनला ३,०६,४३८ रु. नफा झाला. त्यापैकी ५०,००० रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केल्यावर, शेअर्सवर सरकारनें हमी घेतलेले २½ % डिव्हिडंड देण्यासाठी पुरेशी रक्कम उरली नाहीं; फक्त २,५६,४३८ रु. उरले. आणखी ८,६८,५६१ रु. लागतील, ते कराराप्रमाणें मध्यवर्ती सरकार देईल व अशा रीतीनें २½ % डिव्हिडंड वाटलें जाईल.

कॉर्पोरेशन कंपन्यांच्या मालमत्तेच्या अग्रहक्काच्या गहाणावर कर्जे देतें. तिनें दिलेलें कर्ज जोंपर्यंत फिटलेलें नाहीं, तोंपर्यंत कर्जदार कंपन्यांनीं त्यांच्या वसूल भांडवलावर ६ % पेक्षा अधिक दरानें डिव्हिडंड वाटूं नये असें बंधन घातलेलें असतें. कर्जाची मुदत सामान्यत: १२ वर्षांची असते.

### कारखान्यांपुढील भांडवलाचे प्रश्न

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनला अनेक मोठ्या उद्योगधंद्यांच्या परिस्थितीची छाननी करण्याची संधि सहाजिकच मिळाली. डॉयरेक्टरांच्या रिपोर्टात त्या संधीचा फायदा घेऊन अनेक उपयुक्त सूचना केलेल्या आढळतात, त्यांचेकडे वाचकांचें लक्ष वेधणें इष्ट होईल. उद्योगधंद्यांच्या बाबतींत निश्चित योजनेचा अभाव, यंत्रसामुग्री वगैरेस पडणाऱ्या किंमतींचा अंदाज न करणें, योग्य किंमतीस पाहिजे तो कच्चा माल मिळेल किंवा नाहीं ह्याकडे दुर्लक्ष, इत्यादि दोष कॉर्पोरेशनला आढळलेले आहेत. बेळतें भांडवल किती लागेल ह्याचा अंदाज नेहमींच चुकीचा ठरतो; मूळ अपेक्षेपेक्षा तें फार जास्त लागतें. उभारणीचा खर्च वाढला आहे, कच्चा माल महाग झाला आहे, मजुरीचे दर वाढले आहेत, इत्यादि कारणानें कारखान्यांत कराव्या लागणाऱ्या गुंतवणुकीची रक्कमहि अंदाजापेक्षा फार लागते आणि उत्पादनाचा मूळ खर्चहि मर्यादित राहूं शकत नाहीं. अपुऱ्या भांडवलाचे कारखाने अडचणींत येण्याचा संभव आहे. कॉर्पोरेशननें दिलेल्या कर्जामुळें, बँकांशीं केलेल्या तजविजींच्या सहाय्यानें कारखान्यांची स्थिति व्यवस्थित रहावी असा कॉर्पोरेशनचा प्रयत्न असतो. कापडाच्या गिरण्यांचे जवळ यंत्रसामुग्री बदलून आजच्या दरानें नवी घेण्यापुरते रिझर्व्ह नाहींत. मध्यम आकाराच्या कंपन्यांवर औद्योगिक लवादांच्या निर्णयामुळें फार ताण पडला आहे. जुन्या यंत्रसामुग्रीचे सहाय्यानें आणि भारी किंमतीनें कापूस खरीदून व मजुरी वाढत्या दरानें देऊन गिरण्या सतत चालू ठेवणें अशक्यप्राय झालें आहे. तरीहि चलनवाढीवर उपाय म्हणून उत्पादन खर्च उतरवून आणि मालाचा दर्जा सुधारून उत्पादन वाढविण्याचें महत्त्व कॉर्पोरेशनच्या डायरेक्टरांनीं प्रतिपादन केलें आहे.

### हंगामी मजुरांच्या रोजगारासंबंधीं निवाडा

साखरेच्या कारखान्यांतील मजूर प्रत्येक हंगामांत पुन्हा कामावर घेण्यांत येतात. ह्या मजुरांच्या वेतनासंबंधीं व रोजगारावर घेतले जाण्याचा हक्कासंबंधीं लखनौ येथील इंडस्ट्रिअल कोर्टानें (शुगर) एक निवाडा दिला आहे. अपर इंडिया शुगर मिल्स ह्या कारखान्याला कोर्टानें असा हुकूम दिला आहे कीं, कारखान्यांतील सर्व हंगामी मजुरांना ऊस गाळण्याला सुरवात झाल्यापासूनचें वेतन देण्यांत यावें. हंगामी मजुरांच्या रोजगारासंबंधीं संयुक्तप्रांत सरकारनें केलेल्या नियमांचा उल्लेख करून कोर्टानें असें म्हटलें आहे कीं, ह्या नियमाप्रमाणें मागील हंगामाच्या दुसऱ्या अर्ध्या भागांत ज्या मजुरांनीं कारखान्यांत काम केलें असेल त्यांनाच पुढील हंगामांत कामावर घेतलें गेलें पाहिजे. त्यांची कपात करण्यांत यावयाची नाहीं. आपल्याला जरूर लागेल त्याप्रमाणें हंगामी मजूर कामावर घेण्याचा हक्क चालकांना देणें म्हणजे एक अनिष्ट प्रथा पाडण्यासारखें होईल. कारखान्यांच्या चालकांचें म्हणणें असें होतें कीं साखरेचा हंगाम सुरू झाल्यापासून एका आठवड्यांत हंगामी मजूर कामावर घेण्याचा हक्क चालकांना असावा, आणि त्यांना हंगामाच्या प्रारंभापासूनचें वेतन न देता, कामावर ज्या दिवसापासून घेतलें तेव्हांपासूनचें वेतन देण्यांत यावें. कोर्टानें कारखान्याचा चालकांचें म्हणणें अमान्य करून वरीलप्रमाणें निकाल दिला.

### कच्चा माल बाहेरून आणला, तरी उद्योगधंद्यास संरक्षण

"परदेशच्या बाजारपेठेसारख्या इतर गोष्टी अनुकूल असल्या तर धंद्याला लागणारा कच्चा माल देशांतच उपलब्ध असला पाहिजे याला महत्त्व देण्यांत येऊं नये असें फिस्कल कमिशननें म्हटलें आहे ही फार चांगली गोष्ट झाली आहे. पंचवीस वर्षांपूर्वीच्या कमिशननें इकडे लक्ष दिलें नव्हतें. कच्चा माल बाहेरूनहि मिळेल तेथून आणतां येतो. जर्मनी, इटली, युनायटेड किंग्डम, जपान सारखे देश त्यांना इतर गोष्टी अनुकूल असल्यामुळें आज कितीतरी वर्षे आपल्या उद्योगधंद्यांना लागणारा बराचसा कच्चा माल बाहेरून आणीत आहेत. अर्थात् हे देश उद्योगधंद्यांना लागणारी यंत्रसामुग्री स्वत: बनविणारे असून त्यांची दृष्टि प्रगतिपर व शास्त्रीय अशी आहे व ते यांत्रिक उत्पादनांत पुरे वाकबगार आहेत. आमचे उद्योगधंदे खंबीर पायावर उभारल्यास या गोष्टींत आम्हांला त्यांजपासून पुष्कळ शिकावयाचें आहे. कारण, कच्चा माल इतर देशांतून घेतल्यानंतरहि त्याचा पूर्ण फायदा मिळण्यास इतर गोष्टींची गरज आहेच. परंतु कांहीं झालें तरी उद्योगधंद्यांना संरक्षण मिळण्याबाबतची ही अडचण दूर व्हावी अशी कमिशनची शिफारस आहे":– श्री. गं. वि. ऊर्फ नानासाहेब पुराणिक, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स.

### टायपिस्टचें काम कष्टाचें असतें

टायपिंगचें काम वाटतें तितकें लीलेनें होणारें नाहीं. टायपिस्ट दररोज टाइपरायटरवर १४ टनांचा दाब टाकतात, असा अंदाज आहे. टाइपरायटरची अक्षरें पांच अष्टमांश इंच खालीं दाबण्यास १४ औंसांचा दाब लागतो. सहा इंच लांबीची ओळ टाइप करण्यास ६० वेळा असा दाब द्यावा लागतो. म्हणजे, प्रत्येक ओळीसाठी ६४० औंस दाब द्यावा लागतो. प्रत्येक पत्र १५ ओळींचें आहे, असें समजल्यास ४० पत्रांना ५,०४,००० औंस म्हणजे १४ टन दाब लागेल. ६०० वेळा टाइपरायटरची कॅरेज परत डावीकडे ओढावी लागते. त्यास पाऊण टनाचा दाब लागेल तो वेगळाच. टायपिस्टला टाइप करतांना एवढी शक्ति खर्च करावी लागते!

ट्रायब्यूनलच्या निवाडा

## बँकांतील कारकुनांच्या व शिपायांच्या पगाराच्या श्रेणी

### भांडवलवार विभागणी

अ दर्जाच्या बँका = २५ कोटींवरील खेळत्या भांडवलाच्या.

ब दर्जाच्या बँका = ७½ कोटी ते २५ कोटी खेळत्या भांडवलाच्या.

क दर्जाच्या बँका = ७½ कोटीखालील खेळत्या भांडवलाच्या

### क्षेत्रवार वाटणी

१ वर्ग = मुंबई, दिल्ली, कलकत्ता, अहमदाबाद.

२ वर्ग = १९४१ च्या खानेसुमारीप्रमाणें पंजाबांत ५०,००० व इतरत्र १,००,००० लोकसंख्या असलेलीं गांवें.

३ वर्ग = बाकीचीं गांवें.

| | कारकून | पट्टेवाले |
|---|---|---|
| **अ दर्जाच्या बँका** | | |
| क्षेत्र—१ वर्ग रु. | ९६–६–१३२–७–१७४–८–१९०–२०५–९–२५०–१०–२९० | ६०–१–७४–१½–८९ |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |
| क्षेत्र—२ वर्ग रु. | ८२–५–११२–६–१४८–७–१६२–१७२–८–२१२–९–२४८ | ४९–१–६३–१½–७८ |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |
| क्षेत्र—३ वर्ग रु. | ७०–४–९४–५–१२४–६–१३६–१४५–७–१८०–८–२१२ | ४०–१–५४–१½–६९ |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |
| **ब दर्जाच्या बँका** | | |
| क्षेत्र—१ वर्ग रु. | ९२–६–१२८–७–१७०–८–१८६–२८०–९–२४५–१०–२८५ | ५६–१–७०–१½–८५ |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |
| क्षेत्र—२ वर्ग रु. | ७८–५–१०८–६–१४४–७–१५८–१६७–८–२०७–९–२४३ | ४६–१–६०–१½–७५ |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |
| क्षेत्र—३ वर्ग रु. | ६६–४–९०–५–१२०–६–१३२–१४०–७–१७५–८–२०७ | ३८–१–५२–१½–६७ |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |
| **क दर्जाच्या बँका** | | |
| क्षेत्र—१ वर्ग रु. | ८६–५–११६–६–१५२–७–१६६–१८०–९–२२५–१०–२६५ | ५२–½–५९–१–६९ |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |
| क्षेत्र—२ वर्ग रु. | ७३–५–१०३–६–१३९–६½–१५२–१६०–७–१९५–७½–२२५ | ४३–½–५०–१–६० |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |
| क्षेत्र—३ वर्ग रु. | ६२–४–८६–५–११६–५½–१२७–१३५–६–१६५–६½–१९१ | ३५–½–४२–१–५२ |
| | (६ वर्षें) (६ वर्षें) (२ वर्षें) (१ वर्ष) (५ वर्षें) (४ वर्षें) | (१४ वर्षें) (१० वर्षें) |

**पूर्व-पंजाबांत शेती-शिक्षणाचीं केंद्रें**—पूर्व पंजाबांतील अंबाला जिल्ह्यांत शेतकऱ्यांना शेतीचें शिक्षण देण्यासाठीं केंद्रें खोलण्यांत येत आहेत. ह्या केंद्रांतून त्यांना लागवडीच्या अद्यावत् पद्धतीचें शिक्षण दिलें जाईल. दर दहा खेड्यांमागें एक शिक्षण केंद्र उघडण्यांत येत आहे

**तांदुळाच्या शिध्यांत कपात**—ज्या हॉटेलांतून भोजन देण्यांत येतें, त्यांना दर माणसामागें ६ औंस तांदुळाचा शिधा मद्रास राज्यांत मिळत असे. ह्यापुढें दरमाणशीं फक्त ५ च औंस शिधा मिळणार आहे. ग्रामीण भागांत दरमाणशीं रोजीं १२ औंस शिध्याचें प्रमाण कायम ठेवण्यांत आलें आहे. तांदूळ कमी पडल्यास त्याची भरपाई इतर अन्नधान्यानें करण्यांत येणार आहे.

**कळसूत्री बाहुल्यांच्या खेळावर कर**—मद्रास सरकारनें कळसूत्री बाहुल्यांच्या खेळावर करमणुकीचा कर घेण्याचें ठरविलें आहे. तिकिटाचा दर ३ आण्यांपेक्षा अधिक नसेल त्यावेळीं दराच्या १/६ कर घेण्यांत येणार आहे. ३ आण्यांपेक्षा जास्त पण पांच आण्यांपेक्षा अधिक नाहीं, अशा तिकिटावर १/५ कर घेण्यांत येणार आहे. तिकिटाचा दर ५ रुपयांपेक्षा अधिक असेल तर १/४ भाग कर घेण्यांत येणार आहे.

**पश्चिम बंगालमध्यें ग्रामोद्योग**—प. बंगाल सरकारनें ग्रामोद्योग आणि छोटे उद्योगधंदे यांना उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. ह्या उद्योगधंद्यांत रेशमाचा धंदा, ताडीच्या गुळाचा धंदा, खादीच्या उत्पादनाचीं केंद्रें, इत्यादींचा समावेश करण्यांत आला आहे. सर्व उद्योगधंदे कांहीं विशिष्ट योजनेप्रमाणें चालविण्यांत येणार आहेत.

**औषधी वनस्पतींची लागवड**—औषधांच्या कारखान्याला लागणाऱ्या औषधी वनस्पतींची लागवड करण्याचे उत्तर प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. लागवडीसाठी राज्यांतील उत्तरेच्या बाजूचा डोंगराळ प्रदेश निवडण्यांत आला आहे. काश्मीरमध्येंही ह्या वनस्पतींची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत आहे. ह्या योजनेसाठी ५ लक्ष रु. मंजूर करण्यांत आले आहेत.

**कराचीहून द्राक्षें येतात तर**—सिंधमधील रसाळ आणि स्वादिष्ट द्राक्षें हल्ली विमानानें रोज मुंबईला आयात केलीं जातात. सिंधमधील द्राक्षाचा हंगाम जूनमध्यें सुरू होतो आणि सप्टेंबर अखेर संपतो. गेल्या कांहीं आठवड्यांत कराचीहून मुंबईला ३०,००० पौंड द्राक्षें आलीं. ता. २३ ऑगस्टला एकाच दिवशीं १५,००० पौंड द्राक्षें मुंबईला आयात झालीं.

बँकिंग ट्रायब्यूनलचा निवाडा

## बँक कारकुनांना स्पेशल भत्ता किती मिळेल ?

| | अ दर्जाची बँक १ क्षेत्र | अ दर्जाची बँक २ क्षेत्र ब दर्जाची बँक १ क्षेत्र | अ दर्जाची बँक ३ क्षेत्र ब दर्जाची बँक २ क्षेत्र | ब दर्जाची बँक ३ क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. |
| ग्रॅज्युएट | १० | १० | ९ | ८ |
| ग्रॅज्युएट नसून बँकिंगचा डिप्लोमा | १० | १० | ९ | ८ |
| ग्रॅज्युएट असून बँकिंगचा डिप्लामा | १५ | १४ | ८ | ७ |
| हेड क्लार्क | १० | ९ | ८ | ७ |
| कामटिस्ट | १० | ५ | ८ | ७ |
| स्टेनोग्राफर | २० | १८ | १६ | १४ |
| पे ऑफिसांतील कॅशची जबाबदारीवाले कॅशर इ. | २५ | २४ | २२ | २० |
| इतर ठिकाणचे कॅशर, इ. सुपरवायझर, सब अकौंटंट, खातें प्रमुख, इ. | ५० | ४८ | ४४ | ४० |

क दर्जाच्या बँकांतून हा खास भत्ता मिळणार नाहीं.

## कनिष्ट नोकरांना स्पेशल भत्ता किती मिळेल?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रु. आ. | रु. आ. | रु. आ. | रु. आ. |
| दफ्तरी | २–० | १–८ | १–० | १–० |
| हेड कॅश मजूर | ५–४ | ४–० | ३–० | २–० |
| वॉचमन, चौकीदार, कॅश दरवान | ५–४ | ४–० | ३–० | ३–० |
| सशस्त्र गार्डस् | १०–० | ९–० | ८–० | ७–० |
| हवालदार, जमादार, नाईक, हेड प्यून | १५–० | १२–० | १०–० | ८–० |

क दर्जाच्या बँकांतून हा खास भत्ता मिळणार नाहीं.

अ दर्जा = २५ कोटीवरील भांडवलाच्या बँका.

ब दर्जा = ७½ " "

क दर्जा = ७½ कोटीखालील भांडवलाच्या बँका.

नं. १ क्षेत्र = मुंबई, दिल्ली, इ.

नं. २ क्षेत्र = पंजाबांत ५० हजार व इतरत्र १ लाखापेक्षां अधिक वस्तींचीं गांवें.

नं. ३ क्षेत्र = बाकीचीं गांवें.

**अमेरिकेंत करवाढ**—कोरिआंतील युद्धाचा खर्च चालविण्यासाठी ५०० कोटी डॉलर्सचे नवीन कर बसविण्याचे अधिकार प्रे. ट्रुमन ह्यांना सीनेट फिनॅन्स कमिटीनें दिले आहेत. कम्युनिस्ट आक्रमणाविरुद्ध अमेरिकेला सशस्त्र करण्यासाठी ह्या कराचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**बिहारच्या गव्हर्नरांचें हिंदींत भाषण**—बिहार विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक ता. २८ ऑगस्ट रोजीं भरली होती. त्यावेळीं बिहारचे गव्हर्नर श्री. अणे हे सभागृहांना उद्देशून हिंदींत भाषण करणार असें प्रसिद्ध झालें होतें. बिहार विधिमंडळाच्या इतिहासांत गव्हर्नरचें भाषण हिंदींत होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार

संपादक "अर्थ" ह्यांस सा. न. वि. वि.

आपण बुधवार ता. ९ ऑगस्ट १९५० चे अंकांत "कारखान्यांवरील पैशाचा ताण" हा जो अग्रलेख लिहिला आहे तो फार मननीय आहे आणि सध्याच्या किंमतवाढीमुळें जुन्या कारखान्यांना अडचण भासत आहे. कलकत्त्याच्या दोन नावाजलेल्या कंपन्यांनीं ५ % चीं डिबेंचर्स काढून पैसे उभारले. इकडे प्रांतिक सरकारें ३ %, ३½ % प्रमाणें कर्जें उभारीत आहेत. टाटा कंपनीसारखे धनाढ्य ४ % प्रमाणें डिबेंचर्स काढण्याचे विचारांत आहेत. तेव्हां बारीक सारीक कारखान्यांची नड कशी भागणार ? ठेवीदारांना मोठ्या दरानें व्याज देऊन, सरकारी कर भरून, नंतर भागीदारांच्या वाट्याला काय मिळणार हा प्रश्नच आहे.

मजुरांच्या पोटाला पुरेसें मिळत नाहीं म्हणून संघटित कामगार वर्गाची तक्रार आहे व ती ते संप पुकारून मागवून घेतील, पण बाकीच्या मजुरांनी व मध्यम वर्गानीं काय करावें! त्यास दुष्काळीं कामावर जावें लागणार असें दिसतें.

अकोला
१२–८–१९५० मा. द. भागवत

### फिरत्या बँकिंगच्या सोयींतील अडचणी

बँक ऑफ पतियाळानें पतियाळा आणि पूर्व पंजाब संस्थानें ह्या राज्यामध्यें फिरत्या मोटारींच्या बँकिंगचा उपक्रम सुरू केला आहे. या योजनेचें उद्घाटन अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं नुकतेंच केलें. त्या वेळीं खेडेगांवांतील जनतेस बचतीची संवय लागण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादन करतांना, ह्या संबंधांतील अडचणींचाहि उल्लेख केला. ते रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर असतांना एका बँकेनें फिरत्या बँकांची योजना पुढें मांडली होती, ती रिझर्व्ह बँकेस धोकायुक्त वाटली. पुढारलेल्या देशांत फिरत्या बँका दृढमूळ झाल्या असल्या, तरी भारतांतील आजची परिस्थिति त्यांस पोषक नाहीं, हें श्री. देशमुख ह्यांनीं स्पष्ट केलें. सुरक्षिततेचा प्रश्न फारच महत्त्वाचा असल्याचें त्यांनीं सांगितलें. बँक ऑफ पतियाळाच्या उपक्रमास अर्थातच त्यांनीं यश चिंतिलें.

### इंदूर परस्पर सहकारी पेढी, मर्यादित, इंदूर

वरील बँकेचें वसूल भांडवल ९९,४१२ रु. असून गंगाजळी व स्पेशल रिझर्व्ह ८८,०६१ रुपयांचा आहे. जनरल रिझर्व्हमध्यें ४१,९११ रु. आहेत. ह्या वर्षीच्या शिफारसीप्रमाणें निधींत रकमा जमा झाल्यावर एकूण निधी भांडवलाच्या १३५·८ % होईल. ठेवी ९,६६,८४० रु. च्या असून येणें कर्जें ७,०६,८६८ रु. चीं आहेत. अहवालाचे वर्षी ५७३ अर्जदारांना ४,२७,१४२ रु. चें कर्ज देण्यांत आलें. एकूण नफा १७,५८९ रु. होऊन भागीदारांना ७ % डिव्हिडंड मिळालें. (चेअरमन: माधव गोविंद नातु. अवैतनिक चिटणीस : दत्तात्रय जनार्दन साठे)

### मध्यवर्ती सहकारी हातमाग विणकरी संघ लि., इचलकरंजी

वरील संघानें अहवालाचे वर्षी ९२,५४७ रु. ची सूत खरेदी व ९९,६०३ रु. ची सूत विक्री केली आणि २,०२९ रु. चा नफा मिळविला. सभासदांच्या मालाच्या तारणावर कर्जें देण्यास संघानें प्रारंभ केला आहे. त्याच्या ७३ सभासदांनीं ३३,३५७ रु. चीं कर्जें घेऊन फायदा घेतला. संघानें कागद, रिले, घोटी, गणे वगैरे मालही सभासदांना पुरविला आहे. अहवालाचे वर्षी संघास रेशन धान्य दुकान मिळालें, तें त्यानें कार्यक्षमतेनें व किफायतशीरपणें चालविलें. संघास "अ" वर्ग मिळाला आहे. (चेअरमन—शं. बा. होगाडे. सेक्रेटरी—ग. बा. कोळेकर)

### जेफरसनच्या कागदपत्रांस प्रसिद्धि

दि प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेसनें टॉमस जेफरसनला आलेलीं व त्यानें लिहिलेलीं पत्रें आणि त्याचे लेख यांनीं भरलेले प्रत्येकी ७०० पृष्ठांचे ५० ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. योजना पुरी होण्यास २० वर्षे लागतील. पहिला ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. सर्व ग्रंथांत मिळून जेफरसनला आलेलीं २५,००० व त्यानें लिहिलेलीं १८,००० पत्रें समाविष्ट होतील. जेफरसनच्या जन्मास १९४३ मध्यें २०० वर्षें पुरीं झालीं, त्यानिमित्त हें प्रचंड काम करण्यांत येत आहे. जेफरसन हा अमेरिकन स्वातंत्र्याच्या चळवळीचा एक प्रमुख पुढारी होता आणि १७७६ च्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करण्यांत त्याचें महत्त्वाचें अंग होतें. १८०१ व १८०५ अशा दोन वेळा तो अमेरिकेचा अध्यक्ष निवडून आला.

---

### ग्रेट ब्रिटनकडे संपत्ति नेणारे प्रवासी

ग्रेट ब्रिटनकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत आहे. १९४८ सालापेक्षां १९४९ मध्यें ४५,००० प्रवासी जास्त गेले; त्यांची एकूण संख्या ५,४९,००० भरली. त्यांत १,००,००० अमेरिकन व ३३,००० हजार कनेडियन होते. १,१५,००० प्रवासी ब्रिटिश साम्राज्यांतील देशांतून आले. ३६,००० नीं विमानानें प्रवास केला. सर्व प्रवाशांनीं मिळून सुमारें ६५ कोटी रु. ग्रेट ब्रिटनमध्यें खर्चले. त्यांतील २७ कोटी रु. डॉलर गटाकडून मिळाले.

### इंपोर्ट लायसेन्समुळें खजिन्यांत भरती

माल आयात करण्यासाठी इंपोर्ट लायसेन्स घ्यावा लागतो. त्याचा दर खालीलप्रमाणें आहे.

| आयातीची किंमत | परवाना फी |
|---|---|
| १० हजार रु. | १० रु. |
| १ लक्ष रु. | २५ रु. |
| १ लक्ष रु. वर | १०० रु. |

आयातीच्या परवान्यासाठी करावयाच्या प्रत्येक अर्जापोटीं वरील प्रमाणें फी भरावी लागते. जानेवारी ते जून १९५० ह्या सहामाहींत भारत सरकारला ह्या मार्गानें २४ लक्ष रु. मिळाले. जुलै—डिसेंबरच्या सहामाहींत इतकीच रक्कम मिळेल असा अंदाज आहे. म्हणजे—सुमारें ५० लक्ष रुपये भारत सरकारास ह्या मार्गानें सहजगत्या मिळत आहेत,

---

### टाटांच्या कंपनींत सरकारचें ५०% भांडवल


टाटा लोकोमोटिव्ह अॅण्ड इंजिनिअरिंग कंपनीनें रेल्वेसाठी बॉइलर्स तयार करण्यास प्रारंभ केलेलाच आहे. कंपनीचें सध्याचें भांडवल २ कोटी रु. आहे. गेल्या वर्षीं भारत सरकार कंपनीस २ कोटींचें कर्ज देणार होतें, परंतु तें प्रत्यक्ष देण्यांत आलेंच नाहीं, त्यांत कांहीं अडचणी आल्या. आतां सरकार कंपनीचे सुमारें २ कोटी रु च ५% क्यु. प्रेफरन्स भाग विकत घेणार आहे असें समजतें.


# आपली बचत

## साठे बिस्किट अॅण्ड चॉकोलेट कं. लि., पुणें-२

## यांचे भागांत गुंतवणेंच श्रेयस्कर

**कंपनीनें पहिल्याच वर्षीं ५ टक्के नफा वाटला आहे.**



## वीज उत्पादनाची तपशीलवार माहिती

भारतीय संघराज्यांत आतां समाविष्ट झालेल्या प्रदेशांत १९४९ च्या अखेर दहा वर्षांत विद्युदुत्पादन दुपटीनें वाढलें आहे. १९३९ मध्यें २४४ कोटी किलोवॅट तास होतें, तें १९४९ मध्यें ४९० कोटी वॅट तास झालें. भारतांतील सर्व विद्युत् निर्मिती केंद्रांची उत्पादन शक्ति १९४९ मध्यें १९·४ लक्ष किलोवॅटस् होती.

### खेड्यांतील विद्युतीकरण

खेड्यांत विद्युतीकरणामध्यें मद्रास, म्हैसूर, उत्तर प्रदेश आणि पंजाब या राज्यांत विशेष प्रगति दिसून आली. १९४७ मध्यें प्रत्येकी ५ हजाराहून कमी वस्ती असलेल्या १,२९५ खेड्यांमध्यें विजेची व्यवस्था झाली होती, तर १९४९ मध्यें अशा २,११८ खेड्यांना वीज मिळाली. म्हणजे आतां शेंकडा ६३·६ टक्क्यांनीं वाढ झाली आहे. परंतु सबंध देशाचा विचार करतां १९४९ मध्यें एकूण खेड्यांपैकीं ५००० पेक्षा कमी वस्तीच्या अवघ्या ०·३८ खेडेगांवांतच वीज असल्याचें दिसून येतें. खालील तक्त्यांत विविध लोकसंख्येच्या शहरांतील आणि खेडगांवांतील विजेचें शेंकडा प्रमाण दिलें आहे.

| लोकसंख्या | भारतांतील शहरें किंवा खेडीं यांची एकूण संख्या | विद्युतीकरणाचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|
| १,००,००० चे वर | ४९ | १०० टक्के |
| ५०,०००ते१,००,००० | ८७ | ९८·९ टक्के |
| २०,००० ते ५०,००० | २७७ | ८४·१ टक्के |
| १०,००० ते २०,००० | ६०७ | ३८·० टक्के |
| ५,००० ते १०,००० | २,३६७ | ९·३ टक्के |
| ५,०० चे खालीं | ५,५९,०६२ | ०·३८ टक्के |

### अधिक वीज कोण वापरतात ?

१९४९ मध्यें देशांतील विजेच्या सुमारें दोन तृतीयांश विजेचा वापर उद्योगधंद्यांकडून झाला. त्यानंतर घरांत, कर्षणांत (ट्रॅक्शन), व्यापारधंद्यांत, पाणी पुरवठा खात्यांत, पाटबंधाऱ्यांसाठीं आणि रस्त्यावर लावण्याकरतां, अशा क्रमानें विजेचा उपयोग करण्यांत आला. पाटबंधाऱ्यांकरितां १९४८ पेक्षा अधिक २४ टक्के विजेचा वापर झाला. घरांत आणि व्यापारधंद्यांतहि याच प्रमाणांत वाढ झालेली दिसून आली. उद्योगधंद्यांतील कापडाच्या व तागाच्या गिरण्यांनींच सर्वांत अधिक वीज वापरली.

### घटक राज्यांतील दरमाणशीं विजेचा वापर

सर्व देशाचा साकल्यानें आढावा घेतां भारतांत १९४९ मध्यें दरमाणशीं विजेचा वापर ११·६४ किलोवॅटतास होता. कांहीं घटक राज्यांतील वीज वापराचे आंकडे (किलोवॅट तास) पुढीलप्रमाणें आहेत. दिल्ली (१०५) मुंबई (४७·७) पश्चिम बंगाल (४०·७) आणि म्हैसूर (३९). मध्यभारत, बिहार, मध्यप्रदेश, हैदराबाद, राजस्थान आणि पेप्सु या राज्यांतील दर माणशी वीज वापराचें प्रमाण २ ते ३ किलोवॅट तास इतकेंच होतें. आसाम आणि ओरिसामध्यें तर हें प्रमाण अनुक्रमें ½ व ¾ किलोवॅट तास एवढेंच होतें.

घटक राज्यांनीं चालविलेलीं सात आणि खाजगी कंपन्यांनीं चालविलेलीं दोन अशीं एकूण नऊ विद्युत् केंद्रें १९४९ मध्यें चालू झालीं. यामुळें देशांतील एकूण अधिकृत विद्युत्केंद्रांचा आंकडा ४८६ झाला. पैकीं १९० केंद्रें सरकारी मालकीचीं आहेत. देशांत निर्माण झालेल्या एकूण विद्युत् उत्पादनापैकीं ४० टक्के विजेचें उत्पादन सरकारी मालकीच्या केंद्रांमार्फत झालें. या ४८६ विद्युत् केंद्रांपैकी प्रत्येकास विद्युत् निर्मितीचा कारखाना नाहीं. फक्त ३४७ केंद्रांनाच असे कारखाने आहेत. उरलेलीं केंद्रें विजेचा सोठा घाऊक प्रमाणांत विकत घेऊन त्याचा किरकोळ पुरवठा करतात.

### जलविद्युत् केंद्रांकडून जादा विजेची निर्मिती

१९४९ मध्यें झालेल्या विद्युत् उत्पादनावरून वाफ किंवा तेल यांपासून चालणाऱ्या विजेच्या उत्पादनापेक्षा जलविद्युत् केंद्राकडून विजेचें अधिक उत्पादन झालें होतें असें सिद्ध झालें. देशांतील विद्युत् निर्मिती केंद्रांपैकीं ५५·५ टक्के वाफेवर चालणारीं केंद्रें होतीं. तरी त्यांनीं निर्माण केलेल्या विजेच्या शक्तीचें प्रमाण वर्षभरांत झालेल्या एकूण विद्युत् उत्पादनापैकीं अवघें ४७·५ टक्के इतकेंच होतें. या उलट, पाण्यावर चालणारीं केंद्रें अवघीं ३६·४ टक्के असूनहि एकूण उत्पादनाच्या ५०·७ टक्के विद्युत् उत्पादन त्यांच्यामार्फत झालें. तेलावर चालणाऱ्या केंद्रांमार्फत त्या वर्षांत एकूण उत्पादनापैकी अवघें ३.६ टक्के उत्पादन झालें.

एकूण विद्युत् उत्पादनाच्या ९९ टक्के इतकें उत्पादन ए. सी. करंटचें झालें.

### गुंतलेलें भांडवल व सरासरी आकार


देशांतलि वीज पुरवठा करणाऱ्या केंद्रांत १९४८ च्या अखेरपर्यंत ११८·६ कोटींवर भांडवल गुंतलेलें आहे. पैकीं ५६·२ कोटी भांडवल सरकारी मालकीच्या केंद्रांचें असून बाकीचें ६२·३ कोटी भांडवल खाजगी कंपन्यांचें आहे.

देशांतील विविध कारणांकरितां वापरलेल्या विजेच्या एकूण विक्रीच्या शेंकडा ७० च्यावर विक्री असणाऱ्या अशा चाळीस प्रमुख वीज कंपन्यांचें वसूल झालेलें उत्पन्न ध्यानांत घेतां, विजेच्या दर युनिटाची किंमत ०·९६ आणा इतकी पडली.

### शेअर ट्रॅन्स्फरची सोय

कित्येक लोकांना कंपन्यांच्या शेअर्सची वर्गावर्गी करण्यामध्यें स्टँप ट्रॅन्स्फर फी, पोस्टेज, योग्य तो ट्रॅन्स्फर फॉर्म, इत्यादींची माहिती नसते व त्यामुळें निष्कारण विलंब व नुकसान होतें. ही अडचण दूर करण्याची व्यवस्था श्री. अच्युत शंकर साठे, शेअर व स्टॉक ब्रोकर, 'उल्हास' जंगली महाराज रोड, पुणें ४ ह्यांनीं केली आहे. तरी ह्या व्यवस्थेचा हितसंबंधीयांनीं अवश्य फायदा घ्यावा.

मशिनस् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



पेडणेकर आणि कं. लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
फोन नं.–२१७३८

हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.